**1 ली BIMSTEC युवा शिखर परिषद, गांधीनगर (07 - 11 फेब्रुवारी 2025)**

08 फेब्रुवारी 2025

बंगाल उपसागर प्रदेशातील युवकांमध्ये प्रादेशिक सहकार्याची भावना वाढवण्यासाठी एक उपक्रम म्हणून, भारत 7-11 फेब्रुवारी 2025 रोजी गुजरातमधील गांधीनगर येथे 1 ली BIMSTEC (बहु-क्षेत्रीय तांत्रिक आणि आर्थिक सहकार्यासाठी बंगाल उपसागर उपक्रम) युवा शिखर परिषद आयोजित करत आहे. 4 थ्या BIMSTEC शिखर परिषदेत माननीय पंतप्रधानांनी केलेल्या घोषणेचा पाठपुरावा म्हणून ही शिखर परिषद आयोजित केली जात आहे. ही परिषद ज्ञान भागीदार म्हणून CII YI यांच्यासह युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय आणि परराष्ट्र व्यवहार मंत्रालय यांनी संयुक्तपणे आयोजित केली आहे.

2. 8 फेब्रुवारी रोजी भारताचे युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया, गुजरातचे मुख्यमंत्री श्री. भूपेंद्रभाई पटेल, युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री श्रीमती रक्षा खडसे आणि परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव (पूर्व) श्री. जयदीप मुझुमदार यांनी या शिखर परिषदेचे उद्‌घाटन केले.

3. उद्‌घाटनाच्या वेळी BIMSTEC च्या युवा नेत्यांच्या 3 दिवसांच्या परिषदेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला, ज्यामध्ये उद्योजकता, तंत्रज्ञान, डिजिटल कनेक्टिव्हिटी, सायबरस्पेस, शाश्वत विकास आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सीमांच्या पलीकडे जाऊन संबंध प्रस्थापित करणे यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये या प्रदेशासमोरील आव्हाने आणि संधींवर चर्चा करण्यात आली. 'शेजारधर्म प्रथम' धोरण, 'ॲक्ट ईस्ट' धोरण आणि 'प्रदेशातील सर्वांसाठी सुरक्षा आणि विकास (SAGAR)' या दृष्टिकोनाच्या अनुषंगाने प्रादेशिक सहकार्याला चालना देण्याच्या भारताच्या वचनबद्धतेला या उपक्रमाने पुन्हा एकदा पुष्टी देऊन या प्रदेशातील सामायिक वारशाचे बंध आणखी दृढ झाले आहेत.

4. 'युवक म्हणजे आंतर-BIMSTEC आदानप्रदान यासाठी सेतू' अशी या शिखर परिषदेची संकल्पना आहे. सात BIMSTEC सदस्य देशांमधील (बांगलादेश, भूतान, भारत, म्यानमार, नेपाळ, श्रीलंका आणि थायलंड) सत्तरहून अधिक युवा प्रतिनिधी, ज्यात मंत्री, संसद सदस्य, महापौर, उद्योजक, तंत्रज्ञान विकासक, सांस्कृतिक व्यक्तिमत्त्वे, सोशल मीडिया प्रभावक आणि इतर नागरी समाज नेते यांचा समावेश आहे, शिखर परिषदेच्या विविध सत्रांमध्ये सहभागी होत आहेत. या शिखर परिषदेची व्यापक उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत: (i) सदस्य देशांच्या तरुण नेत्यांना क्षेत्रातील सर्वात महत्त्वाची आव्हाने, आर्थिक आणि सामाजिक समस्या यांचे निराकरण करण्यासाठी आणि विकास कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे; (ii) तरुणांना सक्षम बनवणाऱ्या धोरणात्मक मुद्द्यांवर विचारांचे रचनात्मक आदानप्रदान स्थापित करणे; आणि (iii) उज्ज्वल आणि चांगल्या उद्यासाठी कल्पना निर्माण करणे.

5. या उपक्रमाद्वारे या प्रदेशात युवकांच्या सहभागाला आणि युवकांच्या नेतृत्वाखालील विकासाला आणखी गती मिळेल.

नवी दिल्ली

08 फेब्रुवारी 2025